महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्र १२०** **दिनांक- ०७/०५/२०२१**

**अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखा वसई यांनी १३ वर्षाच्या अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधमास केले जेरबंद.**

दि.३०/०३/२०२१ रोजी वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं.I ३३९/२०२१ भादविसं कलम ३६३ प्रमाणे दाखल झाला होता. सदर गुन्हयातील अपहरीत मुलगी वय १३ वर्ष हीस कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून नेले बाबत वालीव पोलीस ठाण्यात दाखल सदर गुन्हयाचा समांतर तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखा वसई यांचे पथक करत होते.

दिनांक ०५/०५/२०२१ रोजी तांत्रिक तपासा दरम्यानअपहृत मुलगी ही चिंचोटी गाव, गोरातपाडा, ता.वसई येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले. सदर ठिकाणी जावून सापळा लावून सखोल व सविस्तर तपास केला असता मुलीचे ठावठिकाण्याचा शोध घेवून तिला महीला पोलीस हवालदार/१६९२ सुनिता कांटेला, मपोशि/१७११ शेळके यांनी ताब्यात घेतले.

अपहृत अल्पवयीन मुलीस महिला पोलीस अंमलदार यांनी सविस्तर विचापूस केली असता ती राहात असलेल्या मैत्रिणीच्या घरी आरोपीत नामे जमिल अन्सारी याने अपहरीत मुलीस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले बाबत निष्पन्न झाल्यानेअपहृत अल्पवयीन मुलीचा व तिची मैत्रिण यांचे जबाबावरुन भादविसं कलम ३५४ सह कलम पोक्सो अधिनियम ३,४,५ हे कलम नमूद गुन्हयात वाढविले असून सदर आरोपीस अटक करून पुढीलतपास वालीव पोलीस ठाणे येथे चालू आहे.

सदरची कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे),यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनैतिक मानवी वाहतुक प्रति.शाखेचे पोनि/भास्कर नाना पुकळे तसेच सहा.पो.उप.निरी./ महेश यशवंत गोसावी,पोना/६०७ श्याम शिंदे, मपोहवा/१६९२ सुनिता कांटेला तसेच तुळींज पोस्टे मधील(बीट मार्शल) मपोशि/१७११ छाया पांडुरंग शेळके यांनी करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

Scanned with CamScanner